मराठवाड्यातील शालेय पोषण आहार योजना : एक प्रशासकीय अभ्यास
विशेष संदर्भ - परभणी व नांदेड जिल्हा

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानवविज्ञान विद्याशाखेंतर्गत 'लोकप्रशासन' विषयात
पीएच.डी. पदवीकरिता सादर करण्यात येणाऱ्या शोधप्रबंधाचा

आराखडा

* संशोधक *
बलखंडे चंद्रशेखर लक्ष्मणराव

* संशोधन पर्यविक्षक *
डॉ. व्ही. एल. विळेगावे
सहयोगी प्राध्यापक व विभाग प्रमुख,
लोकप्रशासन विभाग,
श्री गुरू बुद्धी स्वामी महाविद्यालय,
पूर्णा (जं.), जि. परभणी

ऑगस्ट २०२०

मराठवाड्यातील शालेय पोषण आहार योजना : एक प्रशासकीय अभ्यास विशेष संदर्भ - परभणी व नांदेड जिल्हा

प्रस्तावना

"शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे, जो प्राशन करीन तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही."

वरील वाक्यावरून शिक्षणाचे महत्त्व स्पष्ट केले आहे. तसेच विद्यार्थी हा जन्मजात विद्यार्थीच असतो आणि शेवटपर्यंत तो विद्यार्थीच राहतो; कारण मानव नवनवीन गोष्टी शिकतच असतो. जगात शिक्षणाचे महत्त्व स्पष्ट करण्याच्या अनुषंगाने अनेक समाजसुधारक, थोर नेते मंडळी यांनी शिक्षणाचे महत्त्व सांगितले आहेत. यामध्ये अब्राहम लिंकन, अमेरिकन राष्ट्राध्यक्ष यांनी हेडमास्तरांस पत्र लिहिले. ते खूप प्रसिद्ध आहे. तसेच भारतातील महात्मा फुले यांनी शिक्षणासाठी खूप परिश्रम घेतले. सुरुवातीला त्यांनी आपल्या पत्नीला शिकवून नंतर तिच्या मदतीने शिक्षण सर्वच स्तरापर्यंत नेऊन पोहोचविले. त्यामध्ये समाजातील अनुसूचित जाती-जमाती, अल्पसंख्याक, अल्पभूधारक व्यक्तींपर्यंत शिक्षण खऱ्या अर्थाने पोहोचले नाही, तर शुद्रांची काय अवस्था होऊ शकते, हे महात्मा फुले आपल्या ग्रंथात सांगतात की,

"विद्येविना मति गेली,
मतिविना नीति गेली,
नीतिविना गति गेली,
गतिविना वित्त गेले,
वित्तविना शूद्र खचले,
इतके अनर्थ एका अविद्येने केले!"

अशा प्रकारे त्यांनी आपल्या 'शेतकऱ्याचे असूड' (१९८३) या ग्रंथात सांगितले आहे.

अशा प्रकारे समाजातील अनेक घटकांतील समाजसुधारकांनी शिक्षणाचे महत्त्व पटवून देण्याचा प्रयत्न केला आहे, तरी पण शिक्षण सर्व स्तरांपर्यंत नेता आले नाही.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारत सरकारने शिक्षण ही काळाची गरज आहे. म्हणून १४ वर्षांखालील मुला-मुलींना मोफत व सक्तीचे शिक्षण देण्याचा निर्णय घेतला आहे, तरी विद्यार्थ्यांच्या उपस्थितीचे प्रमाण कमीच असल्यामुळे मुलांना शाळेत येण्यासाठी शासनाने अनेक योजना अंमलात आणल्या. त्यामुळे मुलांना सुगंधीत दूध देणे तसेच मुलांना कडधान्य देणे त्याच बरोबर अनेक शिष्यवृत्त्या देण्यात येतात.

मुलांनी शाळेत यावे तसेच त्यांचे शिक्षण व्हावे, यासाठी शैक्षणिक योजनेची सुरुवात दिनांक २९ नोव्हेंबर २००१ रोजी सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशावरून सर्व राज्यांत लागू करण्यात आली; परंतु यास हवा तसा प्रतिसाद मिळत नव्हता. म्हणून शासनाने 'शालेय पोषण आहार' ही योजना प्रत्यक्षात आणली. परंतु ही योजना यशस्वी झाली की नाही, याचा शोध घेणे हे संशोधनाचे मुख्य उद्दिष्ट आहे. तसेच लोकप्रशासन हा उपयोजनमूलक विषय असल्याने शासकीय विभागांतर्गत अनेक प्रशासकीय कार्ये करण्यात येतात तसेच जनतेच्या प्रश्नांना यापुढे घेऊन जाऊन आडचणी सोडवण्यात येतात.

शाळेतील मुलांना महाराष्ट्रात सावित्रीबाई फुले यांनी महात्मा फुले यांच्या निधनानंतर दुष्काळजन्य परिस्थितीत स्वतःच्या घरी वसतिगृह चालविण्याचे कार्य केले.

कालांतराने तामिळनाडू या राज्यात इ.स. १९२५ साली राज्य सरकारने स्वतःच्या खर्चाने प्राथमिक शाळांमध्ये पहिल्या योजनेची सुरुवात केली. शालेय पोषण आहार या योजनेसाठी लागणारा निधी मनुष्यबळ विकास मंत्रालयाकडून येतो आणि निधी अगदी राज्य शासनापासून ते शाळेपर्यंत पोहोचवण्यात अनेक वर्षे लागले आहेत. वय वर्षे ६ ते १४ वयोगटातील बालकांना योग्य आहार मिळावा म्हणून केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाने ही योजना दिनांक १५ ऑगस्ट १९९५ रोजी सुरू केली. ही योजना २,४०८ विभागांत सुरुवात केली. या अंतर्गत ४५० कॅलरी हे प्राथमिक स्तरावर आणि १२ ग्रॅम प्रोटीन, एकंदरित २ छटाक अन्न देण्यात येते. माध्यमिक स्तरावर ७०० कॅलरी आणि २० ग्रॅम प्रोटीन, एकंदरित ३ छटाक जेवण देण्यात येते. यामुळे मुलांना लोह, फोलीक ॲसीड आणि विटामीन-ए सारखी पौष्टीक तत्त्वे मिळावी, अशी शिफारस केली. दिनांक १ एप्रिल २००८ पासून संपूर्ण

देशात शालेय पोषण आहार योजनेनुसार नवीन निर्माण झालेल्या शाळेच्या वरील वर्गांकरिता ही सर्व बालके एकत्र येणे गरजेचे आहे. ज्या ठिकाणी पर्यायी सोय नाही, त्या मुलांची उपस्थिती राहावी, गरीब मुलांनी शाळेत यावे यासाठी प्रोत्साहन देणे. उन्हाळ्याच्या सुट्ट्यांमध्ये ज्यावेळी दुष्काळग्रस्त भागात प्राथमिक स्तरावरील मुलांनी साहाय्यता करणे, इ. २००८-२००९ या वर्षामध्ये ११.७४ कोटी मुलांनी तसेच ८.२४ कोटी प्राथमिक अवस्थेत म्हणजेच पहिली ते पाचवी पर्यंतची सोय केली.

थोडक्यात, राज्य शासनाच्या अंतर्गत जिल्हा पातळीवर जिल्ह्यातून, तालुक्यांमध्ये, पंचायत समितींतर्गत गटसाधन केंद्रांच्या माध्यमातून गांवांतील प्रत्येक शाळेत ही योजना राबविण्यात येते.

अशाच प्रकारे परभणी, नांदेड जिल्ह्यांतर्गत येणारे जिल्हे, तालुके व गट साधन केंद्राच्या वतीने शालेय पोषण आहार योजना कितपत यशस्वी झाली, हे तपासणे संशोधनाचे मुख्य उद्दिष्ट आहे.

संशोधनाचे महत्त्व

अनुभवातून व्यक्तीच्या वर्तनात येणारा बदल म्हणजे शिक्षण होय. शिक्षण म्हणजे मानवाने शारीरिक, मानसिक व आत्मिक उन्नती करणे होय. तसेच चरित्र संवर्धन हा सर्व शिक्षणाचा मूलभूत आधार आहे. या दृष्टीने सर्व शिक्षणाची रचना झाली पाहिजे. परिवर्तनशिलता हा जीवनाचा स्वभाव असल्याने शिक्षकांची ध्येये निश्चित करून त्या प्रमाणे वागणे स्वभाविक होय. व्यक्तीच्या विकासाकरिता पोषक वातावरण निर्माण करणे, हेच शिक्षणाचे कार्य आहे.

कार्यवादी विचारवंत शिक्षक ही एक प्रयोगशाळा आहे असे मानतात आणि या प्रयोगशाळेतून अनुभवांची पुनर्रचना होत असते. शैक्षणिक तत्त्वज्ञान आधी तयार करून ठेवलेले व त्या प्रमाणे निमूटपणे वागण्याचे कार्य नव्हे. सामाजिक परिस्थितीची योग्य जाणीव शालेय समाजातूनच बालाकाला झाली पाहिजे. या करिता बालकाला स्वातंत्र्य द्यावे. सतत दडपणाखाली ठेवू नये. समाजात अनेक कार्यक्रम चालतात तसेच शाळेत देखील चालविता

येतात. ज्यामुळे बालकांना कृतीतून शिकता येते. शिक्षकांचे कार्य मार्गदर्शकाचे असावे. या कल्पना आजच्या विज्ञान युगात मान्यता पावल्या आहेत. ब्रह्म जाणून घेण्याची जिज्ञासा या शब्दांनी झाली आहे. वेदांमध्ये केवळ परमार्थ विषयच माहीत नसून, यात मनुष्याचा ऐच्छिक उन्नतीस आवश्यक मानवाच्या आशा-आकांक्षा यांचा समावेश करण्यात आला आहे.

संशोधनाची उद्दिष्टे

संशोधनाचा मुख्य उद्देश हा ज्ञानाच्या कक्षांचा विस्तार करणे, हा असतो. तसेच चिकित्सक दृष्टीने संशोधन करणे, संशोधन कार्य करताना भावना, विचार, मूल्ये यांना महत्त्व नसते.

प्रत्येक नवीन वस्तुला सर्व बाजूने समजावून घेण्याच्या जिज्ञासेमुळे जे ज्ञात, स्पष्ट होत नाही तेथील तथ्यांसंबंधी माहिती मिळविता येते. एखादी घटना घडली, तर त्याचे कार्यकारण संबंध तपासला पाहिजे. कारणे येतात, समाजात घडणाऱ्या घटनांमुळे अनेक बदल घेऊन येतात. त्यातून अनेक समस्या निर्माण होतात. अशा समस्यांचे मूळ शोधणे हा देखील संशोधनाचा उद्देश आहे. नवीन प्रक्रिया शोधून काढण्यात येतात आणि त्या सुधारणा करून नवीन अध्याय प्रक्रियेचा पुरस्कार करण्यात येतो.

शालेय पोषण आहार योजनेचे चिकित्सक संशोधन करताना परभणी व नांदेड जिल्ह्याची आणि त्या अंतर्गत येणाऱ्या शाळांवर ही योजना कशा प्रकारे राबविली जाते, ते चिकित्सक दृष्टीने पाहणे महत्त्वाचे आहे.

१) परभणी व नांदेड जिल्ह्यातील शालेय पोषण आहार योजनेचे यश-अपयश तपासणे.
२) परभणी व नांदेड जिल्ह्यातील शाळेतील मुलांचे सकस आहार विषयाच्या समस्यांचा शोध घेणे.
३) शालेय पोषण आहार योजनेसंबंधी शिक्षक, पालक आणि विद्यार्थी यांची प्रतिक्रिया जाणून घेणे.
४) शालेय पोषण आहार योजना कशी राबविली जाते, ते पाहणे.

५) शालेय पोषण आहार योजनेमुळे शाळेत मुलांच्या उपस्थितीत वाढ झाली काय, ते तपासणे.

६) शालेय पोषण आहार योजनेमुळे मुलांच्या आरोग्यावर कोणता प्रभाव पडला आहे, हे तपासणे.

संशोधनाचे स्वरूप

ज्ञानाच्या तेजाने अज्ञान दूर होतो. संशोधनामुळे वस्तुनिष्ठ समस्येबाबत ज्ञान मिळते. म्हणून संशोधक त्यावर उपाययोजना सुचवून त्यांचे निराकरण करतो. यामुळे अंध रूढीला आळा बसतो. त्यामुळे समाजाच्या विकासाकरिता ज्ञान कल्याणकारी ठरते. तसेच समाजात घडणारे अनेक उपद्रवकारक तत्त्वे याला आळा घालण्याचा प्रयत्न करण्यात येतो. यामुळे समाजामध्ये अनुकूल असे परिवर्तन होईल; कारण प्रगतीला आड येणाऱ्या कारणाने उच्चाटन करण्यासाठी हे उपयुक्त असे नियोजन कार्यक्रम ठरविताना त्यांच्या संबंधीची संपूर्ण माहिती असेल, तर नियोजनास योग्य दिशा ठरविता येते. सामाजिक मिळणारे ज्ञान सर्व प्रकारच्या सामाजिक शास्त्रांना साहाय्यक ठरते; कारण हे शास्त्रे हे मानवी कल्याणासाठी कार्य करतात. त्याच प्रमाणे सामाजिक शास्त्राची भविष्यकथन क्षमता मर्यादित असते; परंतु विशिष्ट परिस्थितीत अंदाज व्यक्त करणे सामाजिक शास्त्रालाच शक्य असते. संशोधनामुळे भविष्यकालीन बऱ्या-वाईट घटनांची माहिती मिळते. विशिष्ट घटकांचे विशिष्ट ज्ञान तयार होते. त्यामुळे अज्ञानाकडून ज्ञानाकडे जाण्याची वाटचाल करता येते.

आज एकंदरित समाजाच्या विचार केला तर शिक्षण अत्यावश्यक आहे. त्याच बरोबर समाजात वावरताना मानव अन्न मिळविण्यासाठी धडपड करतो. समाजजीवनात अनेक समस्या येतात. त्यापैकी मूलभूत गोष्टींकडे लक्ष दिले जाते. मुलांना मोफत व सक्तीचे शिक्षण, एका वेळेचे जेवण, शासन आपली लोक कल्याणकारी आणि सामाजिक बांधिलकीची भूमिका पार पाडताना दिसून येते.

गृहितकृत्ये

एखाद्या समस्येसंबंधी त्यांनी शिक्षणावर आधारलेल्या भावी संशोधनाला प्रोत्साहन देणाऱ्या आणि सैद्धांतिक प्रतिपादन करण्यासाठी मार्गदर्शक करणाऱ्या विधानाला गृहितकृत्य असे म्हणतात. म्हणजेच संशोधकाने वैज्ञानिक पद्धतीने अध्ययन करावे; परंतु त्या विषयासंदर्भात थोडे तरी पूर्वज्ञान असणे आवश्यक असते. संशोधनाच्या अनुभवाच्या आधारे आणि ज्ञानाच्या आधारे संशोधक आपल्या संशोधनाच्या समस्येच्या निराकरणासाठी संभाव्य उत्तरे शोधतो, त्या आधारे मांडणी करतो, त्याला संभाव्य गृहितकृत्य असे म्हणतात.

१) शालेय पोषण आहार योजनेमुळे मुलांच्या दररोज उपस्थितीस वाढ होते.

२) शालेय मुलांचे आरोग्य सुधारण्यास मदत झाली.

३) शैक्षणिक कार्यात उत्साह निर्माण झाला.

४) पालकांनाही या योजनेमुळे समाधान मिळाले.

५) बालमजुरीकडून शिक्षणाकडे मुलांचा कल वाढला.

अभ्यास विषयाची मर्यादा

संशोधन करताना एका विशिष्ट घटकाचेच शास्त्रीय पद्धतीने अध्ययन करणे आवश्यक असते; कारण संशोधन कार्य हे मर्यादित क्षेत्रात अगदी प्रभावीरित्या पार पाडल्या जाऊ शकते; कारण संशोधकाची जिज्ञासू व चिकाटीवृत्ती असते. त्यामुळे संशोधन एखादी घटणाची पाहणी करतो, त्यावेळी तो वास्तविक दृष्टीने पाहत असतो. म्हणूनच मर्यादित संशोधन क्षेत्रात कार्य केले जाते. यात परभणी व नांदेड जिल्ह्यांतील इ.स. २००७ ते २०१७ या दहा वर्षांतील या योजनेचा अभ्यास या संशोधनातून करण्यात येणार आहे व तो या जिल्ह्यातून मर्यादित राहील.

शालेय पोषण आहार योजनेसंबंधी भारत देश व महाराष्ट्र राज्याचा अभ्यास करावा लागतो. एवढ्या व्यापक क्षेत्राचा अभ्यास करण्याऐवजी त्या अंतर्गत मराठवाड्यातील परभणी आणि नांदेड जिल्ह्यांतर्गत येणाऱ्या इ.स. २००७ ते २०१७ या कालखंडामधील शाळेतील या योजनेसंबंधी अडचणींचा अभ्यास संशोधक करणार आहे.

नमुना निवड

प्रस्तुत संशोधनाच्या अध्ययनाचे विश्व व एकक निश्चित स्वरूपाचे माहीत असल्यामुळे अध्यापनासाठी संभाव्य स्वरूप माहीत असल्यामुळे अध्यापनासाठी संभाव्यता नमुना निवड पद्धतीचा उपयोग केला आहे. स्वभावतः नमुना निवड पद्धतीला अंतर्गत साधा यादृच्छिक नमुना निवड पद्धतीचा उपयोग करून लॉटरीद्वारे निवडण्यात येणार आहे.

संशोधन पद्धती

प्रस्तुत संशोधन कार्यात ज्या पद्धतीचा वापर संशोधन कार्यासाठी करण्यात आला आहे, ती पद्धत म्हणजे सर्वेक्षण पद्धत होय. या पद्धतीचा मुख्य उद्देश हा एखाद्या विषया-संदर्भातील वास्तविक परिस्थितीचा अभ्यास करणे, हा असतो.

शालेय पोषण आहार योजना ही सर्व स्तरांतील उद्योग क्षेत्रांवर मोठा प्रभाव पाडते. यातील कर्मचारी व विद्यार्थी यांची भूमिका प्रभावी ठरत आहे. हे स्पष्ट करण्यासाठी संशोधन पद्धती उपयुक्त आहे. या पद्धतीमुळे एखाद्या विषयासंदर्भात सखोल व वास्तविक तथ्य संकलन प्राप्त करता येते.

तथ्य संकलन

प्रस्तुत अभ्यास विषयाच्या अनुषंगाने प्राथमिक व दुय्यम तथ्य स्रोतांचा उपयोग केला जातो.

अ) प्राथमिक स्रोत

तथ्य संकलनाच्या प्राथमिक स्रोतामध्ये प्रश्नावली, मुलाखती, अनुसूची, निरीक्षण यांचा वापर करण्यात येतो.

ब) दुयम स्रोत

प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने प्रकाशित व अप्रकाशित लिखाण, खाद्य व अन्न मंत्रालयांनी सादर केलेले अर्थसंकल्प, ग्रंथ, नियतकालिके, मासिके, साप्ताहिके तसेच इंटरनेट या स्रोतांचा वापर करण्यात येईल.

अध्ययनाच्या मर्यादा

१) प्रस्तुत संशोधन कार्य हे परभणी व नांदेड विभागापुरते मर्यादित आहे.

२) प्रस्तुत संशोधनात विद्यार्थी तसेच योजनेचा अभ्यास केला जाणार आहे.

३) प्रस्तुत संशोधन कार्यात शिक्षक ज्या ठिकाणी कार्य करतात, त्या ठिकाणच्या परिस्थितीचा अभ्यास केला जाणार आहे.

तथ्य सादरीकरण व विश्लेषण

संशोधनांती प्राप्त झालेल्या तथ्यांचे संकलन करून त्यांचे सादरीकरण करण्यात येणार आहे. सादरीकरण केल्यानंतर तथ्यांचे विश्लेषण करण्यात येणार आहे.

पूर्व संशोधनाचा आढावा

प्रस्तुत विषयावरील उपलब्ध वाङ्मयाचा आढावा घेण्यात येणार आहे. विविध प्रकारच्या संशोधनामुळे प्रस्तुत विषयाला कोणत्या प्रकारचे ज्ञान उपलब्ध झाले आहे, हे पाहण्याचा प्रयत्न केला आहे. कोणत्याही विषयाचा आशय स्पष्ट करावयाचा असेल आणि त्या विषयाला तर्काचाच आधार मिळवून घ्यायचा असेल, तर संबंधित विषयावरील वाङ्मयाचा आणि आतापर्यंत झालेल्या संशोधनाचा आढावा घेणे, हे देखील महत्त्वाचे असते. त्यातूनच स्पष्ट तसेच आदर्श मागदर्शन प्रस्तुत अभ्यासाला प्राप्त होते.

विषयाची उत्पत्ती आणि विकास स्पष्ट करण्याचा दृष्टीने कशा प्रकारचा प्रयत्न करणे गरजेचे आहे, त्यातुन पुढे संबंधित विषयात कोणत्या प्रकारचे संशोधन केले जाणे आवश्यक आहे, हे लक्षात येऊ शकते.

संशोधनाचा आराखडा

प्रस्तुत संशोधन कार्य एकूण सहा प्रकरणात विभागले असून, शोधप्रबंधाच्या आकलनासाठी त्यातील आशयाचे प्रकरणनिहाय स्पष्टीकरण केले आहे.

प्रकरण पहिले - प्रस्तावना

प्रस्तुत प्रकरणामध्ये विषयाची प्रस्तावना, शिक्षण म्हणजे काय?, शिक्षणाचा ऐतिहासिक आढावा, आजपर्यंत शिक्षण क्षेत्रातील सुधारणांविषयक कार्यक्रम, शालेय पोषण आहाराची माहिती, त्याच प्रमाणे संशोधन आराखडा व साहित्याचे पुनरावलोकन इत्यादींचा समावेश करण्यात आला आहे. थोडक्यात, पहिल्या प्रकरणात संबंधित विषयाची ओळख करून देण्याचा प्रयत्न केला गेला आहे.

प्रकरण दुसरे - मराठवाड्यातील शालेय पोषण आहार योजनेचा ऐतिहासिक आढावा

दुसऱ्या प्रकरणात प्राचीन काळातील शैक्षणिक पद्धतीपासून ते इंग्रजकालीन शैक्षणिक पद्धतीपर्यंतचा आढावा घेण्यात आला आहे. बौद्धकालीन शिक्षण पद्धती, गुरूकुल परंपरा, मध्ययुगीन काळातील शिक्षण पद्धती यांची थोडक्यात चर्चा केली गेली आहे. त्याच प्रमाणे आधुनिक काळातील इंग्रज काळातील शैक्षणिक धोरण, त्यामध्ये लॉर्ड मेकाले यांचे योगदान याचाही उल्लेख करण्यात आला आहे.

प्रकरण तिसरे - शालेय पोषण आहार योजनेची शासकीय यंत्रणा व कार्ये

प्रस्तुत प्रकरणात शालेय पोषण आहार योजनेचा ऐतिहासिक आढावा, या योजने संदर्भात केंद्र सरकार व राज्य सरकार यांची भूमिका, जिल्हा परिषदेचे योगदान, गट साधन केंद्र, ग्रामसेवक समितीची रचना व यंत्रणा या घटकांवर सखोल चर्चा करण्यात आली आहे. त्याच प्रमाणे परभणी आणि नांदेड जिल्ह्याचे भौगोलिक, सांस्कृतिक, औद्योगिक इत्यादी क्षेत्रांची थोडक्यात माहिती देण्यात आली आहे.

प्रकरण चौथे - परभणी व नांदेड जिल्हा - एक दृष्टिक्षेप

प्रस्तुत प्रकरणात परभणी व नांदेड जिल्ह्यांचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

प्रकरण पाचवे - शालेय पोषण आहार योजनेचे मूल्यांकन

दुसऱ्या प्रकरणात अनुसूची व प्रश्नावलीमार्फत प्राप्त झालेल्या तथ्यांचे व माहितीचे सारणीकरणाच्या माध्यमातून पृथक्करण करून स्पष्ट विवरण देण्यात आले आहे. विद्यार्थ्यांकडून व शिक्षकांकडून प्राप्त झालेली तथ्ये, आकडेवारीच्या माध्यमातून मांडली गेले आहे.**(//please check-tense- मांडली गेले आहे/विवरण देण्यात आले आहे.)**

प्रकरण सहावे - निष्कर्ष व शिफारशी

प्रस्तुत प्रकरणात संशोधनाचा संपूर्ण आढावा घेऊन यात निष्कर्ष मांडले आहेत. शालेय पोषण आहार योजनेत येणाऱ्या विविध समस्या आहेत. त्या दूर करण्यासाठी मूलभूत स्वरूपाच्या उपाययोजना तसेच सूचनाही करण्यात आल्या आहेत. या उपाययोजना व सूचना शासन आणि संबंधित विभागातर्फे प्रत्यक्षात अंमलात आणल्यास विद्यार्थी व प्रशासनात बदल होण्यास मदतच होईल.

संशोधक

बलखंडे चंद्रशेखर लक्ष्मणराव

संशोधन पर्यवेक्षक

डॉ. व्ही. एल. विळेगावे
सहयोगी प्राध्यापक व विभाग प्रमुख,
लोकप्रशासन विभाग,
श्री गुरू बुध्दी स्वामी महाविद्यालय,
पूर्णा (जं.), जि. परभणी

संदर्भ ग्रंथ सूची

१) पाटील आनंद, ---, संतन प्रकाशन, मुंबई, २००४, पृ.८७, ९७, १०२.

२) फाडीयाँ बी. एल., उच्चतर लोकप्रशासन, साहित्य पब्लीकेशन, आग्रा, २००६, पृ.१, २४५, ५२०, ५५०.

३) बोधनकर सुधीर, प्रा. विवेक अलोणी, समाजिक संशोधन पद्धती, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००७, पृ.४८, ४९, ६९, ८७, ८८.

४) मनिषा पाटनकर-म्हैसकर, ---------------------------------------, मदर ग्राफिक्स, मुंबई, २००९, पृ.३२, ३३, ३४, ३५.

५) मनिषा पाटनकर-म्हैसकर, ---------------------------------------, मदर ग्राफिक्स, मुंबई, २००८, पृ.१४, १५.

६) महात्मा फुले, शेतकऱ्याचे असूड, सुगावा प्रकाशन, पुणे, २००४, पृ.१२.

७) एम. लक्ष्मीकांत, टाटा मॅकग्रॉ हिल, ----------------------------------, नवी दिल्ली, पृ.१, ११, १२, १५.

८) आर. कुमार, एस. कुमार, जिल्हा प्रशासन, स्वरस्वती प्रकाशन, -------------, १९९९, पृ.१०२, १०३.

९) सिव्हल सर्वीस क्रोनीकल, सप्टेंबर २००९, पृ.१०१, १०२, १०३.

❑ ❑ ❑